एकलपिकातून बहुपिकाकडे :

पुष्पांजली यांचा प्रेरणादायी प्रवास

Siddharth Kumar Rout

पुष्पांजली यांची कहाणी केवळ एका महिला शेतकऱ्याच्या यशाची गोष्ट नाही. ती भाजीपाला शेतीत घडणाऱ्या मोठ्या बदलाचं प्रतीक आहे. रासायनिक शेतीवर अवलंबून राहण्याऐवजी शाश्वत शेतीकडे, अनिश्चितता आणि जोखमीतून बाहेर पडून स्थैर्याकडे, आणि केवळ घर चालवण्यापुरती शेती करण्याऐवजी चांगलं उत्पन्न मिळवून देणाऱ्या समृद्ध शेतीकडे, हा त्यांचा प्रवास खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.पुष्पांजली यांचं कार्य हे एक जिवंत उदाहरण आहे. ज्ञान, नवकल्पना आणि एकत्रित प्रयत्नांच्या जोरावर अल्पभूधारक शेतकरीही शेतीसमोरील आव्हानांवर मात करू

ओडिशा राज्यातील नयागड जिल्ह्यातलं पेहेलाजू टकेरा हे एक शांत, निसर्गरम्य गाव. याच गावात एका मोठ्या बदलाची सुरुवात झाली–अल्पभूधारक महिला शेतकरी सौ. पुष्पांजली मलिक यांच्यामुळे. जिद्द, कष्ट आणि शाश्वत शेतीवरचा ठाम विश्वास या बळावर त्यांनी केवळ स्वत:ची शेतीच बदलली नाही, तर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनाही नवी दिशा दाखवली.पुष्पांजली यांच्याकडे साधारण एक एकर शेती आहे. पूर्वी त्या मुख्यत: भात आणि वांगी पिकवत असत. या शेतीत रासायनिक खतांचा भरपूर वापर होत असे. परिसरातील इतर अनेक शेतकऱ्यांप्रमाणे त्याही एकाच पिकावर अवलंबून होत्या. यामुळे उत्पन्न फारसं मिळत नव्हतं, आणि जमिनीची सुपीकताही हळूहळू कमी होत चालली होती.



मांडव तंत्राचा वापर करु बहुस्तरीय पीक उत्पादन घेणारी पुष्पांजली

कमी उत्पादन आणि वाढता शेतीखर्च यामुळे कुटुंबाच्या गरजा पूर्ण होणं कठीण झालं होतं. वार्षिक उत्पन्न फक्त ४८,००० असल्याने रोजचा खर्च भागवणंही अवघड जात होतं. अशा परिस्थितीत शेती अधिक उत्पादनक्षम, शाश्वत आणि फायदेशीर बनवणं गरजेचं होतं.

एकल पिकातून मिश्र भाजीपाला शेतीकडे वाटचाल

पुष्पांजली यांच्या आयुष्यातील खरा बदल तेव्हा सुरू झाला, जेव्हा निर्माण संस्थेने शेतकऱ्यांसाठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन देणारे कार्यक्रम सुरू केले. त्यांनी उत्साहाने नैसर्गिक शेती, आर्थिक साक्षरता आणि शेतकरी गट व्यवस्थापन या विषयांवरील प्रशिक्षणांत भाग घेतला. या प्रशिक्षणांमधून त्यांना मिश्र शेती आणि नैसर्गिक शेतीचं महत्त्व कळलं. या पद्धतींमुळे जमिनीची सुपीकता वाढते, कीड-रोग कमी होतात आणि वर्षभर कुटुंबासाठी अन्नसुरक्षा राहते, हे त्यांच्या लक्षात आलं.या ज्ञानातून प्रेरणा घेत त्यांनी एकाच पिकावर अवलंबून राहण्याऐवजी विविध पिकं घेण्यास सुरुवात केली. त्यांनी शेतात उडीद, मूग, कुळीथ, स्थानिक भाताच्या जाती आणि मका यांसोबतच वांगी, कारले, चवळी, काकडी, दोडका, भोपळा, टोमॅटो आणि मिरची अशी विविध भाजीपाला पिकं घेतली. यासोबतच पपई आणि शेवगा यांसारखी फळझाडंही लावली.

शेती अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी शेळीपालन, देशी कुक्कुटपालन आणि अझोला लागवड असे जोडधंदेही सुरू केले. वेगवेगळी पिकं आणि जोडधंदे यामुळे शेतीतली जोखीम कमी झाली आणि कुटुंबाचं उत्पन्न व पोषण दोन्ही सुधारलं.नवीन ज्ञान मिळाल्यानंतर पुष्पांजली यांनी नैसर्गिक शेती पद्धतीसोबतच वेलवर्गीय भाज्यांसाठी ट्रेली (जाळी) तंत्राचाही वापर सुरू केला. यामुळे कारले, शेंगा आणि इतर वेलवर्गीय भाज्यांचं उत्पादन शास्त्रीय पद्धतीने आणि जास्त प्रमाणात मिळू लागलं.

पूर्वी एकाच पिकावर अवलंबून असलेल्या त्यांच्या शेतीत आता वर्षभर चार ते पाच प्रकारचा भाजीपाला पिकवला जातो. यामुळे कुटुंबाच्या गरजा सहज भागू लागल्या, आणि स्थानिक बाजारालाही ताजा भाजीपाला मिळू लागला.आज पुष्पांजली खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामांत मिळून दरवर्षी १२ ते १३ क्विंटल भाजीपाला पिकवतात. त्यांच्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न ४८,००० वरून सुमारे ६४,००० पर्यंत वाढलं आहे–म्हणजे जवळपास २० टक्क्यांची वाढ. घरगुती गरजा भागवून उरलेला भाजीपाला त्या स्थानिक आठवडी बाजार, शेतकरी उत्पादक कंपनी आणि इतर खरेदीदारांना विकतात. या उत्पन्नातून त्या आता स्वत:चं नवं घर बांधत आहेत–त्यांच्या जिद्दीचं आणि कष्टाचं हे मूर्त प्रतीक आहे.

तरीही काही अडचणी अजून कायम आहेत. सेंद्रिय मालासाठी वेगळी आणि चांगला भाव देणारी बाजारपेठ नसल्याने अनेकदा त्यांना कमी किमतीत माल विकावा लागतो. शिवाय भाजीपाला साठवण्याची पुरेशी सोय नसल्याने बाजारभाव कमी असतानाही लगेच विक्री करावी लागते.

स्वत:च्या यशातून इतरांसाठी प्रेरणा

पुष्पांजली यांच्या बदलाचा प्रभाव फक्त त्यांच्या कुटुंबापुरता राहिला नाही. त्यांच्या यशातून प्रेरणा घेऊन 'अनंतखोला महिला स्वयं-सहाय्यता गटा'तील आणखी दहा महिलांनीही मिश्र भाजीपाला शेती सुरू केली. विशेष म्हणजे पुष्पांजली या महिलांना केवळ प्रेरणा देत नाहीत, तर त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि सतत मदतही करतात, ज्यामुळे त्याही आता शाश्वत शेतीच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल करत आहेत.त्यांच्या स्वयं-सहाय्यता गटाला तालुका कृषी विभागाकडून १०,००० चं बीजभांडवल मिळालं. या पैशांतून त्यांना सुधारित बियाणे, आवश्यक शेती अवजारे आणि वाहतुकीची सोय उपलब्ध करून घेता आली. या आर्थिक मदतीसोबतच निर्माण (NIRMAN) संस्थेकडून मिळालेलं प्रशिक्षण आणि मार्गदर्शन यामुळे पुष्पांजली यांनी केवळ घर चालवण्यापुरती शेती न करता, अतिरिक्त उत्पन्न मिळवून देणारी शाश्वत आणि बाजाराभिमुख शेती यशस्वी करून दाखवली.

पुष्पांजली आत्मविश्वासाने सांगतात,

'आमच्या स्वयं-सहाय्यता गटाचं सहकार्य आणि कृषी विभागाकडून मिळालेल्या बीजभांडवलामुळे आम्हाला ट्रेलीसारखी नवी तंत्रं आत्मविश्वासाने वापरता आली. आज मी माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नात आणि गावाच्या विकासात मोलाचं योगदान देऊ शकते, याचा मला मनापासून अभिमान वाटतो.'

Siddharth Kumar Rout
State Program Coordinator
NIRMAN
Plot: S-2/15,
1st Floor, Niladri Vihar
Bhubaneswar, Odisha - 751021
E-mail: kksdfnirman@gmail.com

***Source** : Spicing up Resilience, LEISA India, June 2025*
मराठी अनुवाद : अनिकेत लिखार

